Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ASHTI

Tq. Ashti Dist. Beed (Pin 414 203) ☎ 282532, 283101

(NAAC ACCRDITED "B" GRADE COLLEGE)

e-mail-acca_123 @ rediffmail. com. website : http: // acscashti.org.in

Principal Dr. S. R. Nimbore

2016-17

No. ACCA/2016 - 2017 /                                Date 02 /08 /2016

O/C

प्रति,
कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

विषय : वृक्षारोपन अहवाल सादर करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, दि. १ जुलै २०१६ रोजी मांजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंती दिनी आमच्या महाविद्यालयाच्या परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी वृक्षारोपन केलेले आहे.

तरी त्या संबंधीचा अहवाल सादर करत आहे स्विकारुन सहकार्य करावे हि विनंती.

सोबत.

१. अहवाल
२. फोटो
३. पेपर कात्रण (बातमी)

Programme Officer
Arts, Commerce and Science College Ashti Dist-Beed

PRINCIPAL
Arts, Commerce & Science College, Ashti (Beed) (M.S.)

PRINCIPAL
Arts Commerce & Science College, Ashti Tal.Ashti Dist Beed

3/8/16

## राष्ट्रीय सेवा योजना

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी ता. आष्टी जि. बीड

## वृक्षारोपन अहवाल

दि. १ जुलै २०१६ रोजी माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंती दिनी महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र या संकल्पने अंतर्गत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी मधील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोर (नाना) हंबर्डे तसेच आष्टीचे तहसीलदार मा. रामेश्वर गोरे, नायब तहसीलदार प्रदिप पांडूळे महाविद्यायलाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयातील परिसरात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या वृक्षारोपन कार्यक्रमास सुरुवात झाली. उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. या नंतर मा. किशोर (नाना) हंबर्डे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की वृक्ष जगले तर मनुष्य जगेल त्यामुळे वृक्षारोपनासोबतच वृक्षसंगोपन महत्वाचे आहे. तसेच तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र या संकल्पने अंतर्गत २ कोटी वृक्ष राज्यभर लावण्यात येणार असून या मध्ये सर्वांनी सक्रिय सहभाग घेवून प्रत्येकाने एक वृक्ष लावावा व त्याचे संगोपन करून शासनाच्या उपक्रमात सहभागी व्हावे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी वृंद विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते व यासर्वांनी वृक्ष संवर्धनाचा निश्चय केला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मुटकुळे यांनी तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. सुहास गोपने यांनी केले.

Programme Officer
Arts,Commerce and Science
College Ashti Dist-Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College,Ashti (Beed) (M.S.)

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

वृक्षारोपन करण्या अगोदर आ. ता. शि. प्र. म. अध्यक्ष मा. किशोरजी हंबर्डे यांनी मा. तहसिलदार रामेश्वर गोरे यांच्या हातात वृक्ष देताना सोबत प्राचार्य डॉ. एल. आर. निंबा. व स्वयंसेवक प्राध्यापक

Arts Commerce & Science College, Ashti Tal. Ashti Dist. Beed
ACSCA



PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal.Ashti Dist Beed



मा. अध्यक्ष, तहसिलदार व प्राचार्य तसेच कार्यक्रम अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपन करताना.

Programme Officer
Arts, Commerce and Science
College Ashti Dist Beed

...यो. कार्यक्रमाधिकारी, [illegible] व स्वयंसेवक

Arts Commerce & Science College, Ashti, Tal.Ashti Dist.Beed(M.S.)
ACSCA






रा. से. यो. विभागाच्या स्वयंसेविका विद्यार्थिनी वृक्षारोपण करताना

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

Programme Officer
Arts, Commerce and Science
College Ashti Dist.Beed

२

वृक्षारोपण करताना महाविद्यालयातील प्राध्यापक
श्री. आर. एस. सालभाई व. प्रा. विजयकुमार गवळे

Science College, Ashti Tal.Ashti Dist.Beed (M.S.)
ACSCA





वृक्षारोपन करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. एस. वाबमारे
व. प्रा. एन [illegible] नानवटे

PRINCIPAL
Arts Commerce & Science
Ashti Tal.Ashti Dist.Beed

PRINCIPAL
Arts, Commerce & Science
College, Ashti (Beed) (M.S.)

Programme Officer
Arts, [illegible] ce
[illegible]

# पार्श्वभूमी

Tuesday 2016/07/05



Arts Commerce & Science College, Ashti, Tal.Ashti Dist.Beed (M.S.)
ACSCA


## किशोर हंबर्डे व तहसीलदार गोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण

कडा (प्रतिनिधी)– माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र या संकल्पनेच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या परिसरात आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोर (नाना) हंबर्डे व आष्टीचे तहसीलदार मा. रामेश्वर गोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी नायब तहसीलदार प्रदीप पांडुळे, तांगे साहेब उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हंबर्डे यांनी वृक्ष जगले तर मानव जगेल असे सांगून वृक्षांचे संगोपन करावे असे सांगितले तर गोरे यांनी महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र या उपक्रमात आपणही– आपण वृक्षा रोपण करून सहभाग नोंदवावा असे सांगितले या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मुटकुळे व प्रा. अशोक भोगाडे यांनी केले या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम सोनटक्के, प्रा. दिलीप धापटे, प्रशासकीय अधिकारी प्रा. शंकरराव काकडे, प्रा. ज्ञानेश्वर नवले, प्रा. विजय गलांडे,


पान २ वर



PRINCIPAL
Arts Commerce & Science College, Ashti Tal.Ashti Dist.Beed

Programme Officer
Arts Commerce and Science College Ashti Dist-Beed

PRINCIPAL
Arts, Commerce & Science College, Ashti (Beed) (M.S.)

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ASHTI

Tq. Ashti Dist. Beed (Pin 414 203) ☎ 282532, 283101

(NAAC ACCRDITED "B" GRADE COLLEGE)

e-mail-acca_123 @ rediffmail. com. website : http: // acscashti.org.in

Principal **Dr. S. R. Nimbore**

No. ACCA/2016 - 2017/108 Date 25/06/2016

प्रति,
मा. तहसिलदार
तहसिल कार्यालय आष्टी,
ता.आष्टी जि. बीड

विषय :- महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन कार्यक्रमास उपस्थित राहणे बाबत.
विषय :- ससं/उशि/औ/2कोटीवृला/शिष्य/2016/3364 दि. 20/06/2016

महोदय,

वरील संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने विदीत करण्यांत येते की, राज्य शासनाने हरित महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन व जनतेच्या सहभागातुन सन 2016 मधील पावसाळ्यात वन महोत्सव कालावधीत दि. 1 जुलै 2016 ह्या एकाच दिवशी राज्यात किमान 2 कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. त्यानुसार आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहभागातुन विविध प्रकारची 150 वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

मा. साहेबांनी दि.1 जुलै 2016 रोजी ठीक 10:00 वाजता आमच्या महाविद्यालयात उपस्थित राहून आमच्या विद्यार्थ्यांस प्रोत्साहन द्यावे ही विनंती.

कळावे!

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College,Ashti (Beed) (M.S.)

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ASHTI
Tq. Ashti Dist. Beed (Pin 414 203) ☎ 282532, 283101
(NAAC ACCRDITED "B" GRADE COLLEGE)
e-mail-acca_123 @ rediffmail. com. website : http: // acscashti.org.in
Principal Dr. S. R. Nimbore

No. ACCA/2016 - 2017 / 109 Date 25/ 6 /2016

O/C

प्रति,
मा. कृषी अधिकारी
तालुका कृषी कार्यालय, जळगांव,
ता. आष्टी जि. बीड.

विषय : - वृक्ष लागवड करणेसाठी रोपे मिळणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी मागणी करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र संकल्पना कार्यक्रमांतर्गत 1 जूलै 2016 रोजी वन महोत्सव दिनी वृक्ष लागवडीसाठी आमच्या महाविद्यालयाच्या परिसरामध्ये 150 वृक्षांची लागवड करणे आहे.त्यासाठी आम्हाला करंजी 50, गुलमोहर 20, काशीद 20, ग्लिसरीया 30, कडूलींब 20, चिंच 10 रोपे, अशा प्रकारच्या जातीच्या रोपांची आवश्यकता आहे.

आमच्या महाविद्यालयापासून नजीकच्या अंतरावर असलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोप वाटीका, बेलगांव यांचे कडून वरील प्रमाणे रोपे उपलब्ध करुन द्यावीत ही विनंती.

Received
25/6/16
S A Deshmane
9420579703

PRINCIPAL
Arts, Commerce & Science
College, Ashti (Beed) (M.S.)

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal. Ashti Dist Beed

2018-19

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ASHTI
[illegible]
(NAAC ACCREDITED "B" GRADE [illegible])
e-mail - [illegible] Website - [illegible]

No. ACCA / 201[illegible]-201[illegible] Date: [illegible] 201[illegible]

Arts Commerce & Science College, Ashti, Tal.Ashti Dist.Beed (M.S.) ACSCA

प्रति,
मा. सहसंचालक,
उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

विषय: १३ कोटी वृक्ष लागवड सन २०१८ चे उद्दिष्ट वाटप बाबत.
संदर्भ: मसं/उशि/औरं/वृक्षलागवड/१३ कोटी/संगोपन/दैनंदिन/[illegible]
दि. २८/०५/२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत महाविद्यालय परिसर व दत्तक गाव परिसरामध्ये वृक्ष लागवडी संदर्भात आवश्यक असलेले खड्डे तयार करण्यात आलेले असून, सामाजिक वन विभागाकडे वृक्षांच्या मागणी बाबत चे पत्र दिलेले असून त्यानुसार वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

तसेच हरितसेना महाराष्ट्र शासन सदस्य होण्यासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांना प्रोत्साहन देवून मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तरी सदरील माहिती स्विकारून सहकार्य करावे ही विनंती.

PRINCIPAL
Arts Commerce & Science College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science College, Ashti Tal.Ashti Dist.Beed

सोबत--

रोपवन स्थळांची माहिती तक्ता.

# रोपवन स्थळांची माहिती

| विभागाचे नाव | साईट समन्वयकाचे नाव | मोबाईल क्रमांक | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | सर्वे क्र/ गट क्रमांक | क्षेत्र (हे/कि.मी.) | लक्ष | अक्षांश | रेखांश | खोदलेल्या खड्ड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | प्रा. डी. एन. मुडकुळे | 9421340955 | कला. वाणिज्य व विज्ञान महा. आष्टी | आष्टी | बीड | 163 | 4 हे. 46 आर | 50 | 18.8044 N | 75.168 E | 50 |
| | | | | | | | | | | | |
| | | | कासवाडी (दत्तक गाव) | आष्टी | बीड | 152 | 2 हे. | 50 | 18.8044 N | 75.168 E | 50 |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College.Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal.Ashti Dist.Beed

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

**कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी**

ता. आष्टी, जि. बीड (पीन ४१४ २०३) फोन : (०२४४१) २२२[illegible]

(NAAC ACCREDITED) "B++" GRADE COLLEGE

e-mail-acca_123@rediffmail.com. website : http://acscashti.org.in

(ISO-9001-2[illegible]

अध्यक्ष : श्री. किशोर बी. हंबर्डे　　　　प्राचार्य : डॉ. एस.आर.निंबोरे

जा.क्र. कवाविमं/२०१९ -२०२०/447　　　　दिनांक :06 /08 /२०१९

प्रति,
मा. मुख्याधिकारी,
नगरपंचायत, आष्टी,
ता. आष्टी जि. बीड

**विषय: रोपे मिळणे बाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरून विनंती अर्ज करतो की, आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी. या महाविद्यालयातील परीसरामध्ये वृक्षारोपण करण्यात येणार आहे. त्यासाठी आम्हाला वृक्षांची आवश्यकता आहे.

महाविद्यालयाला वृक्षारोपणासाठी विविध जातीची १५० झाडे आवश्यक आहेत. दिलेल्या रोपांचे आम्ही चांगल्या प्रकारे संगोपन करू याची हमी देतो.

तरी रोपे देऊन सहकार्य करावे.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist.Beed

आवक - जावक
नगर पंचायत, आष्टी
2336
6/8/2019

2018-19

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी

ता. आष्टी, जि. बीड (पीन ४१४ २०३) फोन : (०२४४१) २...

(NAAC ACCREDITED) "B++" GRADE COLLEGE

e-mail-acca_123@rediffmail.com. website : http://acscashti.org.in (ISO-9001-2015)

अध्यक्ष : श्री. किशोर बी. हंबर्डे — प्राचार्य : डॉ. एस.आर.निंबोरे

जा.क्र. कवाविमं/२०१८-२०१९/606 — दिनांक :28/08/२०१८

प्रति,
मा.तहसिलदार साहेब,
तहसिल कार्यालय, आष्टी,
ता.आष्टी, जि.बीड

विषय : केरळ महाप्रलय नागरी सहाय्यता निधी संकलनासाठी रॅलीचे आयोजन करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, केरळ येथे उद्‌भवलेल्या नैसर्गिक महापूरामुळे अनेक कुटूंब उध्वस्त झाले असून त्यात मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यासाठी आम्ही आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२९ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता आष्टी शहरातून 'पुरग्रस्त मदतनिधी संकलन रॅलीचे' आयोजन केले आहे. तरी याची नोंद घेवून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

Recived
28/8/2018
आवक — तहसिल कार्यालय

PRINCIPAL
Arts Commerce & Science College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science College,Ashti,Tal.Ashti,Dist.Beed

lal's

College

Fund

resulted in hazardous

t everything. In this

to face problems of

responsibility, NSS

ted people of Kerala.

ι streets of Ashti city.

nty four) rupees was

(A/C 67319948232)

rathwada University

# AHARASHTRA GRAMIN BANK

(A Scheduled Bank established by Govt. of India)

HEAD OFFICE : TOWN CENTRE CIDCO, AURANGABAD-431 003

BRANCH - Ashti

**nowledgement of RTGS/NEFT Fund transfer**

DATE : 3/08/018

Received From : Principal, A.C.S. coll, N.S.S.

Account No. : 54551000591

Account Type : Savings / Current / CC / OD etc.

| | |
|---|---|
| RTGS/NEFT Amount | : ₹ 35924 |
| Charges | : ₹ 08 |
| Total | : ₹ 35932 |

**Details of RTGS/NEFT centre and benefieiary are as under.**

1. Name of the beneficiary : Principle Secretary, (Finance)
2. Bank Name : State Bank of India,
3. Branch Name : THIRUVANTMAPURAM.
4. Account Type & Account No. : 67319948232
5. IFSC Code : SBIN0070028
6. City : THIRUVANANTHAPURAM
   Contact No. : 9850488943
7. UTR No. : MAHNH18245181610 (to be filled in by the Branch)

I authorise to debit my account with your branch along with the charges if any & remit the same fund as per details given. I/We agree to abide by the terms and conditions stipulated by RBI for RGTS/NEFT fund remittance.

Branch seal & Signature

Applicant's Signature

Note : Remittance would be effected as per RBI's Rules

The said collection of relief fund was an assistance and collection of all villagers, shop keeper, labours, workers, service men and even students. The rally was led by Principal Dr. S. R. Nimbore, vice principal Dr. S. G. Gopane, Prof. A. A. Kandale, NSS Programme Officer Dr. B. S. Waghmare, Prof. R. S. Satbhai, Prof. S. M. Khude, Prof. M. S. Vairage, Ex. NSS Programme Officer Dr. B. N. Mutkule and all staff in teaching and non teaching sections. NSS volunteers participated in rally. The rally was gives wide publicity through news papers.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti, Tal.Ashti, Dist.Beed

Ashti Tauka Shikshan Prasarak Mandal's

# Arts, Commerce & Science College

Ashti Tal. Ashti Dist. Beed

NATIONAL SERVICE SCHEME

## Report of Rally for Kerala Relief Fund

**Date: 29.08.2018**

---

Recently the state of Kerala was affected by flood which resulted in hazardous loss in almost every field. Many families were distracted and lost everything. In this calamity, agriculture, business, offices, industries, hospitals had to face problems of health and food.

Considering this natural calamity as our moral duty and responsibility, NSS department of our college organized a rally to collect funds for affected people of Kerala.

On 29th August 2018, we had Kerala relief fund rally on main streets of Ashti city. The amount of Rs.35924/- (Thirty five thousand nine hundred twenty four) rupees was forwarded to Principal Secretary (Finance), Treasurer CMDRF (A/C 67319948232) through RTGS as per order of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad.

The said collection of relief fund was an assistance and collection of all villagers, shop keeper, labours, workers, service men and even students. The rally was led by Principal Dr. S. R. Nimbore, vice principal Dr. S. G. Gopane, Prof. A. A. Kandale, NSS Programme Officer Dr. B. S. Waghmare, Prof. R. S. Satbhai, Prof. S. M. Khude, Prof. M. S. Vairage, Ex. NSS Programme Officer Dr. B. N. Mutkule and all staff in teaching and non teaching sections. NSS volunteers participated in rally. The rally was gives wide publicity through news papers.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College,Ashti,Tal.Ashti,Dist.Beed

201

# Photo of Kerala Relief Fund Rally

**Dt.29.08.2018**

Arts Commerce & Science College, Ashti, Tal.Ashti Dist.Beed (M.S) ACSCA






PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College,Ashti,Tal.Ashti,Dist.Beed

2019-20

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी

ता. आष्टी, जि. बीड (पीन ४१४ २०३) फोन : (०२४४१) २२२५३२

(NAAC ACCREDITED) "B++" GRADE COLLEGE

e-mail-acca_123@rediffmail.com. website : http://acscashti.org.in

(ISO-9001

अध्यक्ष : श्री. किशोर बी. हंबर्डे | प्राचार्य : डॉ. एस.आर.निंबोरे

जा.क्र. कवाविमं/२०१९-२०२०/475 दिनांक : 23/08/2019

प्रति,

मा. संचालक,

राष्ट्रीय सेवा योजना,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद.

**विषय:** सन २०१९ मधील १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत होणाऱ्या वृक्षारोपण कार्यक्रमाचा १ जुलै २०१९ रोजी केलेला शुभारंभ व अंमलबजावणी अहवाल सादर करणे बाबत.

**संदर्भ:** आपले पत्र एनएसएस/२०१९-२०/९०८५ दिनांक: २५/०७/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यात येतो की, आमच्या महाविद्यालयात दि. १ जु २०१९ ते आज पर्यंत केलेल्या ३३ कोटी वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत कार्याचा अहवाल सदर करत आहोत. अहव स्विकारून सहकार्य करावे.

१. ग्रीन आर्मी पोर्टलवरील माहिती भरलेली छायांकित प्रत.

२. महाराष्ट्र हरित सेना सदस्यत्व प्रमाणपत्र.

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist.Beed

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
राष्ट्रीय सेवा योजना
जावक क्र.
दि. 26/8/19

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

# ३३ कोटी वृक्षारोपण अहवाल

ACSCA
Arts Commerce & Science College, Ashti Tal.Ashti Dist.Beed (M.S.)

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यात येतो की, आमच्या आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. १ जुलै २०१९ रोजी आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोरनाना हंबर्डे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या मोहिमेची सुरुवात करण्यात आली या वेळी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कमवा व शिका विभागाच्या वतीने महाविद्यालयीन परिसरात ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वेळी छोटेखानी वृक्ष संवर्धन काळाची गरज या विषयावर डॉ. रवि सातभाई यांचे व्याख्यान झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून बोलताना मा. किशोरनाना हंबर्डे यांनी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. फक्त वृक्षारोपण करून भागणार नाही त्याचे संगोपनही तेवढेच काळजीपूर्वक व सातत्याने करावे लागणार आहे. वृक्षासारखे निस्वार्थी जगात कोणीही नाही असे प्रतिपादन केले.

यावेळी प्राचार्य, डॉ. एस. आर. निंबोरे सरांनी महाविद्यालयात होत असलेल्या पर्यावरण संवर्धनासाठी होणाऱ्या कार्याची माहिती दिली. महाविद्यालय परिसरात जुने २५० झाडे असून आपला परिसर ग्रीन ऑडीटेड आहे. ग्रामीण भागातील हे एकमेव उदाहरण आहे. असे सांगून दिवसेंदिवस परिस्थिती गंभीर होत असून वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे असे आपले मत व्यक्त केले.

करिता अहवाल सदर करीत आहोत त्याचा स्वीकार करावा.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College Ashti Tal.Ashti Dist Beed

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College Ashti Tal.Ashti Dist Beed

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वन विभाग

# 'महाराष्ट्र हरितसेना' सदस्यत्व प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

श्री. / श्रीमती : Ashti Taluka Shikshan Prasarak Mandals Arts Commerce And Science College Ashti

रा. : Beed

तालुका : Ashti जिल्हा : Beed

यांना 'महाराष्ट्र हरितसेना' चे सदस्यत्व प्रदान करण्यात येत आहे.

लोकहिताच्या कार्यात सहभागी झाल्याबद्दल

हार्दिक शुभेच्छांसह !

नोंदणी क्रमांक : BI/2019/Org/160402

दिनांक महिना वर्ष

25 07 2019

प्रधान मुख्य वनसंरक्षक
सामाजिक वनीकरण,
महाराष्ट्र राज्य,
पुणे

ACSCA — Arts, Commerce & Science College, Ashti Tal. Ashti Dist. Beed (M.S.)

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal. Ashti Dist Beed

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

# वृक्ष लागवड व संवर्धन ही काळाची गरज - किशोर हंबर्डे

आष्टी । वार्ताहर

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपणाच्या कार्यक्रमानिमित्त संस्थेचे अध्यक्ष मा. किशोर नाना हंबर्डे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले ते म्हणाले वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे.



तसेच वृक्षारोपण करून भागणार नाही त्याचे संगोपनही तेवढ्याच काळजीपूर्वक व सातत्याने करावे लागणार आहे. वृक्षासारखे या विश्वात निस्वार्थ कोणीही राहिले नाही. वृक्ष निस्वार्थपणे येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक वाटसरूला सावली देण्याचे काम अविरतपणे करत असतात .असे मनोगत याप्रसंगी त्यांनी व्यक्त केले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे उपप्राचार्य डॉ. सुहास गोपने ,अविनाश कंदले ,पर्यवेक्षक प्रा. अशोक भोगाडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. महेंद्र वैरागे ,डॉ. रवी सातभाई तसेच प्रा. अग्रवाल,प्रा. देवगुडे प्रा.कांबळे प्रा.कोल्हे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी उपस्थित होते.

Arts Commerce & Science College, Ashti Tal.Ashti Dist.Beed (M.S.)
ACSCA

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

Programme Officer(NSS)
SPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

# वृक्षलागवड व संवर्धन ही काळाची गरज - किशोर हंबर्डे

आष्टी, दि.४ (प्रतिनिधी):- आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने वृक्षारोपणाच्या कार्यक्रमानिमित्त संस्थेचे अध्यक्ष किशोरनाना हंबर्डे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी हंबर्डे म्हणाले की, वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. वृक्षारोपण करून भागणार नाही त्याचे संगोपनही तेवढ्याच काळजीपूर्वक व सातत्याने करावे लागणार आहे. वृक्षासारखे या विश्वात निस्वार्थ कोणीही राहिले नाही. वृक्ष निस्वार्थपणे येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक वाटसरूला सावली देण्याचे काम अविरतपणे करत असतात असे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सोपान निंबोरे, उपप्राचार्य डॉ. सुहास गोपने, अविनाश कंदले, पर्यवेक्षक प्रा.अशोक भोगाडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. महेंद्र वैरागे, डॉ. रवी सातभाई, प्रा. अग्रवाल, प्रा. देवगुडे, प्रा.कांबळे, प्रा.कोल्हे, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी उपस्थित होते.




Arts Commerce & Science College, Ashti, Tal. Ashti Dist. Beed (M.S.) ACSCA

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal. Ashti Dist Beed

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ASHTI

Tq. Ashti Dist. Beed (Pin 414 203) ☎ 282532, 283101

(NAAC ACCRDITED "B++" GRADE COLLEGE)

e-mail - acca_123@rediffmail.com Website : www.acscasht.com (ISO-9001-2015)

**President Shri. Kishor B. Hambarde** **Principal Dr. S. R. Nimbore**

No. ACCA / 2019 -2020/422 Date 23 /07 /2019

by E mail. 23/07/019

प्रति,
मा. सहसंचालक,
उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद.

विषय: सन २०१९ मधील १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत होणाऱ्या वृक्षारोपण कार्यक्रमाचा १ जुलै २०१९रोजी केलेला शुभारंभ व अंमलबजावणी अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ: आपले पत्र ससं/उशि/औवि/अनुदान-५/वृक्ष लागवड/२०१९/३०३६ दिनांक: २०/०७/२०१९३

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून अहवाल सादर करतो की, आमच्या महाविद्यालयात दि. १ जुलै २०१९ रोजी आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोरनाना हंबर्डे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या मोहिमेची सुरुवात करण्यात आली या वेळी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कमवा व शिका विभागाच्या वतीने महाविद्यालयीन परिसरात ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वेळी छोटेखानी वृक्ष संवर्धन काळाची गरज या विषयावर डॉ. रवि सातभाई यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून बोलताना मा. किशोरनाना हंबर्डे यांनी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. वृक्षारोपण करून भागणार नाही त्याची संगोपनही तेवढेच काळजीपूर्वक व सातत्याने करावे लागणार आहे. वृक्षासारखे निस्वार्थी जगात कोणीही नाही असे प्रतिपादन केले.

यावेळी प्राचार्य, डॉ. निंबोरे सरांनी महाविद्यालयात होत असलेल्या पर्यावरण संवर्धनासाठी होणाऱ्या कार्याची माहिती दिली. महाविद्यालय परिसरात जुने २५० झाडे असून आपला परिसर ग्रीन ऑडीटेड आहे. ग्रामीण भागातील हे एकमेव उदाहरण आहे. असे सांगून दिवसेंदिवस परिस्थिती गंभीर होत असून वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे असे आपले मत व्यक्त केले.

| अ.क्र. | अगोदरची वृक्ष | नविन वृक्ष | एकूण |
|---|---|---|---|
| १ | २६३ | ५० | ३१३ |

अहवाल सादर करीत आहोत स्विकारून सहकार्य करावे.

सोबत: वृक्षारोपनाची वृतपत्रातील कात्रणे व फोटो.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts, Commerce & Science
College, Ashti Tal.Ashti Dist.Beed

2019-20


आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी

ता. आष्टी, जि. बीड (पीन ४१४ २०३) फोन : (०२४४१) २८२५३३

(NAAC ACCREDITED) "B++" GRADE COLLEGE

e-mail-acca_123@rediffmail.com. website : http://acscashti.org.in (ISO-9001-2015)

अध्यक्ष : श्री. किशोर बी. हंबर्डे प्राचार्य : डॉ. एस.आर.निंबोरे


जा.क्र. कवाविमं/२०१९ -२०२० /473 दिनांक : 23/ 8 /२०१९ 26

प्रति,
मा.संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषय : कोल्हापूर व सांगली जिल्हयातील पूरपरिस्थितीमध्ये मदत अहवाल स्विकारणे बाबत.

संदर्भ : एन.एस.एस./२०१९—२०२०/११४६ दि.१९/०८/२०१९

महोदय,

वरील संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, दिनांक ०८/०८/२०१९ ते १७/०८/२०१९ दरम्यान आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत कोल्हापूर व सांगली जिल्हा येथे प्रत्येक्ष जाऊन केलेल्या मदत कार्य केले आहे.

सदर कालावधीत दरम्यान केलेल्या विविध मदत कार्याचा सविस्तर अहवाल पाठवित आहोत. सदर अहवाल स्वीकारुन सहकार्य करावे.

सोबत :—
१) अहवाल

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

PRINCIPAL
Arts and Commerce
College,Ashti,Tal.Ashti,Dist.Beed (MS)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
राष्ट्रीय सेवा योजना
जावक क्र.
दि. 26/8/19

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College.Ashti Tal.Ashti Dist Beed

# कोल्हापूर सांगली पूरग्रस्त मदत अहवाल

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने केलेल्या कोल्हापूर सांगली पूरग्रस्त मदतीसाठी केलेल्या कार्याचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

संस्था अध्यक्ष मा. किशोर नाना हंबर्डे यांच्या प्रेरणेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०८/०८/२०१९ रोजी प्राचार्य कार्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवी सातभाई, डॉ. सुहास गोपणे, श्रीमती. सुभांगी खुडे यांची चर्चा झाली. या चर्चेत आपल्या रा.से.यो. युनिट मार्फत या पूर परीस्थितीवर मदत करण्यासाठी काय करता येते याबाबत कार्यक्रम ठरवला. यानुसार आष्टी हे तालुकाचे ठिकाण आहे. त्यामुळे चांगली बाजार पेठ आहे तर या बाजार पेठेतून नवीन कपडे मिळवणे, अन्नधान्य, भांडे व इतर गरजेच्या वस्तू जमा करणे, मदत फेरी काढून रोख स्वरुपात मदत मिळवणे या स्वरूपाचे कार्य ठरले. मा. प्राचार्य साहेबांनी एक अभिनव संकल्पना मांडली ते म्हणाले, " आपण आपल्या सर्व विद्यार्थीवर्गाला आव्हान करू की, कोल्हापूर सांगली कर आपले बांधव आहेत, त्यांना आज मदतीचे गरज आहे, तेव्हा तुम्ही तुमच्या गावातून मदत जमा करा." ही संकल्पना सगळ्याना खूप आवडली.

त्यानुसार दि. ०९/०८/२०१९ ला ऑगस्ट क्रांती दिनाच्या कार्यक्रमात प्राचार्य साहेबांनी स्वतः सर्व विद्यार्थ्यांना आव्हान केले की, आपल्या घरातून होईल तितकी मदत मग ती धान्यस्वरुपात असेल, रोख स्वरुपात वा इतर आसेल ती तुम्ही रा.से.यो. विभागात दि. १३/०८/२०१९ पर्यन्त जमा करा. हे स्वतः च्या घरावर आपत्ती आहे या पद्धतीने करा." या वेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. रवी सातभाई यांनी स्वयंसेवकाचे गावानुसार गट तयार केले व त्याची माहिती याच कार्यक्रमात सागितली.

ठरल्यानुसार सर्व स्वयंसेवकानी उत्कृष्ट कार्य केले. ७६००० रु. रोख रक्कम, २ लाख रुपयाचे अनधान्य, बिस्कीट, पाणी बॉटल, खाद्यपदार्थ जमा करण्यात आले. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे ५ लाख रुपयाचे औषधी जमा केली. साहित्य जमा झाल्यानंतर मा. प्राचार्य डॉ. निंबोरे सरांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्या बैठकीत डॉ. सातभाई यांनी जमा झालेल्या साहित्याचे व रोख रक्कमची माहिती प्राचार्य साहेबाना दिली व प्रस्ताव मांडला की, ही मदत आपण स्वतः जाऊन पोहोच करू, तसेच जमा झालेली औषधी व आणखी काही औषधी डॉक्टरमित्रांची मदत घेऊन खरेदी करूयात व काही डॉक्टर लोकांना पण सोबत येण्याची विनंती करूयात. त्यानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य निंबोरे सर व कार्यक्रम अधिकारी डॉ. रवी सातभाई यांनी डॉ. मुरुडे, डॉ. भळगट, डॉ. तरटे यांना विनंती केली की तुम्ही मदत करण्यासाठी सोबत चला व आम्ही जमा केलीली सामग्री चेक करून नवीन काही खरेदी करण्याची विनंती केली. त्यांनी ती तात्काळ मान्यकेली.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

त्यानुसार दि. १५/०८/२०१९ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा ७३ वा वर्धापनदिन व ध्वजारोहण कार्यक्रम करून कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवी सातभाई यांची नेतृत्वात प्रा. डॉ. बाबासाहेब मुटकुळे, प्रा. नवले, डॉ. अनिल मुरुडे, डॉ. भळगट, डॉ. युवराज तरटे, मेडिकल चालक शरद वांदरे, भंडारी, व १० स्वयंसेवक, जी.प. प्राथमिक शाळा, दोलावडगावचे स्कायुट गाइडचे बाबासाहेब पवार, आंधळे सर व १० स्वयंसेवक आशा पद्धतीचा ग्रुप निघाला. महाविद्यालय प्राचार्य डॉ. निंबोरे सरांनी निरोप दिला. आमच्या सोबत एक ट्रक, ३ रुग्णवाहिका, व एक चारचाकी ताफा होता. आम्ही संध्याकाळी मुकाम इस्लामपूर जि. सातारा करून सकाळी आम्हाला मा. सुरेश अण्णा धस, आमदार, विधान परिषद यांच्या मदतीने मिळालेले गाव शिरोळ तालुक्यातील शिरोढोन येथे नादनी आरोग्य केंद अधिकारी श्रीमती. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोहचलो. या ठिकाणी कामाच्या विभागणी साठी डॉक्टर पथक यात डॉक्टर, औषधी दुकानदार व २ स्वयंसेवक एक गट केला. त्याचे नेतृत्व डॉ. अनिल मुरुडे यांच्याकडे सोपवले तर दुसरा गट प्रा. डॉ. बाबासाहेब मुटकुळेयांच्या नेतृत्वात गावसर्वे व मदत वाटपासाठी दिला. व मी स्वतः दोन्ही गटात समन्वयक म्हणून कार्यरत राहिलो. जि. प. शाळा, शिरढोण माळवस्ती या ठिकाणी निवारा केंद्र चालू होते, त्या ठिकाणी जाऊन आरोग्य तपासणी केली, व डॉ. रवी सातभाई याच्या नीर्देशानुसार दुसर्या टीम गावात जाऊन मदत निधी वाटप साहित्य वाटप केले.

संध्याकाळी शिरोळचे तहसीलदार मा. श्री. गिरी साहेबांनी आम्हाला बोलावून आमच्या कार्याची प्रशंसा केली व राज्य नियोजन आयोगाने तुमच्या कार्यांची दखल घेतली आहे याची माहिती दिली. व दुसर्या दिवशीतुम्ही कुरुंदवाड व हेरवाड या कालच म्हणजे दि. १५/०८/२०१९ रोजी १२ दिवसाच्या पुरानंतर बाहेर पडलेल्या गावात मदत करा अशी विनंती केली. त्यानंतर आम्ही जयशिंगपूरला महेश्वरी भवनला निवास व भोजन केले.

दुसर्या दिवसी ठरल्याप्रमाणे कुरुंदवाड ला रवान झालो. विठ्ठल मंदिरात मेडिकल केंद्र चालू करून, दत्त कारखान्यावर मदत साहित्य वाटपासाठी दुसरी टीम रवान झाली. साधारणपणे १ वाजता आम्ही हेरवाड कडे रवान झालो. त्या ठिकाणी पण मेडिकल केंद्र ग्रामपंचायत जवळ चालू केले व शिव मंदिरात मदत साहित्य वाटप केले.

हे सर्व करून दि. १/०८/२०१९ संध्याकाळी आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो व दि.१८/०८/२०१९ रोजी सकाळी ५ वाजता महाविद्यालयात पोहचलो. या पद्धतीने महाविद्यालय स्तरावर आम्ही कोल्हापूर व सांगली येथील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी कार्य केली.या साठी आम्हाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विध्यार्थीनी मदत केली व रा.से.यो.विभागास या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.


वरील प्रमाणे आम्ही केलेल्या कार्याचा अहवाल सादर करत आहोत.

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College Ashti Tal.Ashti Dist Beed





PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed


Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed





**PRINCIPAL**
Arts Commerce & Science
College Ashti Tal.Ashti Dist Beed

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed





PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

# दुष्काळी आष्टी तालुक्यातील शिक्षक व डॉक्टर बांधवांनी कोल्हापुरातील पुरग्रस्थ लोकांचे पुसले आश्रू



आष्टी दि. १७ (प्रतिनिधी) :- मौजे शिरढोन ता. शिरोळ जिल्हा कोल्हापूर येथे पुरग्रस्तांना भेट देत शुक्रवारी पाहणी करून जीवनावश्यक धान्य, कपडे, आधार, किराणा व वैद्यकीय साहित्य देऊन मानसिक आधार देताना मी आणि संपूर्ण नगर व कडा आष्टी येथील ग्रुप सदस्य दिसत आहेत. थेट पुरग्रस्थ लाभार्थी यांची पंच गंगा नदी पात्रात भेट घेऊन व्यथा जाणून घेतल्या असताना अचानक मिळालेला आधार पाहून संपूर्ण कुटुंब धायमोकलून आश्रू वाहिले. आपण कुठून आलात आमची येवढी मोठी काळजी तुम्ही सोडून कोणी घेतली नाही अशा प्रतिक्रिया दिल्या. अक्षरशः १२ दिवस पुरात संपूर्ण घर २० ते २५ फूट पाण्यात बुडाली होती त्यामुळे घरात कोणतेच काही सामान साहित्य नीट राहिले नाही, ना विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य ना अन्न धान्य ना कागद, कपडे, घर पडलेली, पूर वगरस्कर ८ ते १० लोक मृत्यू मुखी झाल्या नंतर ना अंत्यविधी साठी जागा होती त्यामुळे मुख्य डांबरी तोडवर विधी करावा लागला हे खूप भयंकर दुःख हेलवणारी गोस्ट दिसून आली घर जमीनदोस्त झाली काही ठिकाणी लोकांनी घरदार सोडून मंदिरात, शाळेत, मुख्य रस्त्यावर आपला संसार थाटला आहे. डोळ्यात आणि हृदयात खूप विदारक चित्र … आहे अशी वेळ परत कधी ही कोणावर ही येऊ नये ही प्रार्थना कडा आष्टी नगर येथील डॉक्टर मित्रांनी व शिक्षकांनी खूप मेहनत घेऊन मोठी मदत केली पुरग्रस्थ भागातील अनेक गावात अजून शेवटच्या घरापर्यंत मदत पोहचली नसून राज्यातील जनतेने थेट लाभार्थी यांना मदत देने गरजेचे आहे एकुण २२ लोकांची टीम आष्टी भागातून आली आहे आणि आपले काम ही प्रामाणिक पने पार पाडत आहे.

, नातवंडे असा परिवार आहे. निनाळ … भूमी परिवार सहभागी आहे.

## … उमेदवार निश्चित

… त्यासाठी राज्यभरातून सुमारे ११०० अर्ज … खर्तीचे अहवाल प्रदेश कॉंग्रेसला पाठवले … क मतदारसंघातून दोन ते चार नावे निश्चित

… मतदारसंघातील संभाव्य उमेदवार निवडले

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal.Ashti Dist Beed

2018-19

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ASHTI

Tq. Ashti Dist. Beed (Pin 414 203) ☎ 282532, 283101

(NAAC ACCRDITED "B++" GRADE COLLEGE)

e-mail - acca_123@rediffmail.com Website : www.acscasht.com (ISO-9001-2015)

President Shri. Kishor B. Hambarde Principal Dr. S. R. Nimbore

No. ACCA / 2018 -2019 / 62 Date 06 / 05 /2019

by Email
06/05/2019

O/L

प्रति,
मा.संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय : दि.०१/०५/२०१९ रोजी पाणी फांऊडेशन द्वारा आयोजित महाश्रमदान शिबीरातील सहभागाबाबतचा अहवाल स्विकारणे बाबत.**

**संदर्भ :** रा.से.यो./२०१८—२०१९ दि.११/०४/२०१९.

महोदय,

वरील संदर्भीय विषयास अनुसरुन अहवाल सादर करण्यात येतो की, आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'पाणी फांऊडेशन वॉटर कप—२०१९' मध्ये सहभागी झालेल्या मौजे शेरी(बु.) ता.आष्टी जि.बीड येथे दिनांक०१/०५/२०१९ रोजी तसेच पांगुळगव्हाण ता.आष्टी जि.बीड येथे दिनांक०२/०५/२०१९ रोजी महाश्रमदान शिबीरात सहभाग नोंदविला आहे. त्यात महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रा.से.यो.स्वयसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन श्रमदान केले.

तरी सदरील अहवाल स्वीकारुन सहकार्य करावे हि विनंती.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College.Ashti Tal Ashti Dist Beed

महाश्रमदान शिबीरात श्रमदान करताना महाविद्यालयीन कर्मचारी व रा.से.यो. स्वयंसेवक

Arts, Commerce & Science College, Ashti, Tal. Ashti, Dist. Beed (M.S.)
ACSCA





PRINCIPAL
Arts, Commerce & Science
College Ashti Tal. Ashti Dist. Beed

2019-20

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी
ता. आष्टी जि. बीड (पीन ४१४ २०३) फोन
(NAAC ACCREDITED) "B++" GRADE COLLEGE
email-acsca_123@rediffmail.com website : http://acsashti.org
(ISO-9001-2015)
अध्यक्ष : श्री. किशोर बी. हंबर्डे प्राचार्य : डॉ. एस.आर.निंबोरे

जा.क्र. कवाविमं/२०१९-२०२०/277 दिनांक : 18/07/2019

O/C

प्रति,

**मा. संचालक,**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषय: तंबाखू मुक्त अभियान अहवाल सादर करणे बाबत.
संदर्भ: आपले पत्र NSS/२०१९-२०/९६७७ दि. १६/०७/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी येथे आयोजित दि. १६-१७ जुलै २०१९ रोजी साजर्या केलेल्या तंबाखू मुक्त अभियान अहवाल आपल्या कार्यालयास सादर करत आहोत, त्याचा स्वीकार करून सहकार्य करावे.

सोबत:

- अहवाल
- कार्यक्रमाचे फोटो
- पेपर कात्रणे

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts and Commerce
College,Ashti,Tal.Ashti,Dist.Beed (MS)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना
आवक क्र.
दि. 23-7
औरंगाबाद

## तंबाखू मुक्त अभियान

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय तंबाखू मुक्ती अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. रा.से.यो. विभागाने सूचित केल्या प्रमाणे दि. ११/०७/२०१९ रोजी तंबाखू मुक्तीची शपथ घेऊन या अभियानाची सुरवात झाली. दि. १६ व १७ जुलैला परत जागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आले. या मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दोन प्रबोधन पर व्याख्याने आयोजन करण्यात आले होते.


दि. १६/०७/२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सभागृहात पहिले प्रबोधनपर व्याख्यान कार्यक्रम अधिकारी डॉ. रवि सातभाई यांनी दिले. यात जागतिक स्तरापासून ते स्थानिक स्थरांपर्यंत तंबाखूचे वापराचे प्रमाण, त्यामुळे होणारे आजार व मृत्युमुखी पडणाराची संख्या, तंबाखू खाणाऱ्या व नखाणाऱ्या सोबत राहण्याच्या शरीरावर होणारे परिणाम याचा सविस्तर आढावा घेऊन विद्यार्थ्यांना तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. निंबोरे हे होते तर राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. शुभांगी खुडे यांनी सूत्र संचालन केले.


दि. १७/०७/२०१९ ला प्रा. डी. पी. मुंढे यांचे दुसरे प्रबोधनपर व्याखान झाले याव्याख्यानात त्यांनी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून तंबाखू व्यसनाची दाहकता स्पष्ट केली. तसेच व्यसनाधीनता ही कशी मानसिकता आहे व तिचा आपल्या मानसिकतेद्वारे आपल्या शरीरावर कसा ताबा मिळवते याचे वर्णन करून विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निंबोरे सर होते. सरांनी त्याच्या भाषणात तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. तसेच व्यामामुळे शरीर निरोगी राहते रोगप्रतिकार शक्ती वाढते त्यामुळे नियमित व्यायाम करा आशा पद्धतीचा उपदेश दिला. कार्यक्रमाच्या दोन दिवस आयोजनात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवि सातभाई, डॉ. सुहास गोपणे, प्रा. श्रीमती. शुभांगी खुडे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. यावेळी विभागाचे १०० स्वयंसेवक कार्यरत होते. त्यांनी व्यसन मुक्ती कार्यात आपला खारीचा वाटा उचलण्याचा या प्रसंगी निश्चय केला.

उपरोक्त पद्धतीने महाविद्यालयातील तंबाखू मुक्त अभियान राबवण्यात आले करिता अहवाल सादर करत आहोत.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts and Commerce
College, Ashti, Tal. Ashti, Dist Beed (MS)





PRINCIPAL
Arts Commerce & Science
College, Ashti Tal.Ashti Dist Beed

2019-20


# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी

ता. आष्टी, जि. बीड (पीन ४१४ २०३) फोन : (०२४४१ ...)

(NAAC ACCREDITED) "B++" GRADE COLLEGE

e-mail-acca_123@rediffmail.com. website : http://acscashti.org

ISO-9001-2015

अध्यक्ष : श्री. किशोर बी. हंबर्डे प्राचार्य : डॉ. एस.आर. निंबोरे


जा.क्र. कवाविमं/२०१९ -२०२० / 69 दिनांक : 16/12/२०१९

प्रति,

मा. वैद्यकीय अधिक्षक,

ग्रामीण रुग्णालय, आष्टी.

ता. आष्टी जि. बीड

विषय: स्वच्छता शिबीर घेण्यास परवानगी मिळणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा एक दिवसीय स्वच्छता शिबीर ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे घेण्याचे ठरले आहे. या स्वच्छता शिबिरास परवानगी देऊन सहकार्य करावे.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College Ashti Tal.Ashti Dist Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science
College,Ashti,Tal.Ashti,Dist.Beed

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी

ता. आष्टी, जि. बीड (पीन ४१४ २०३) फोन : (०२४...)

(NAAC ACCREDITED) "B++" GRADE COLLEGE

e-mail-acca_123@rediffmail.com. website : http://acscashti.org.in

(ISO-9001-2015)

अध्यक्ष : श्री. किशोर बी. हंबर्डे

प्राचार्य डॉ. एस. आर. निंबोरे

जा.क्र. कवाविमं/२०१८ -२०१९ /585

दिनांक : 03/10/२०१९

प्रति,
मा.संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय : स्वच्छता ही सेवा कार्यक्रमाचा अहवाल स्विकारणे बाबत.**

संदर्भ : एन.एस.एस./२०१९–२०२०/१२१४ दि.०१/१०/२०१९.

महोदय,

वरील संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, दिनांक ०२/१०/२०१९ रोजी आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत आयोजित स्वच्छता ही सेवा कार्यक्रम महाविद्यालयात राबवीला.

सदर कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल पाठवित आहोत. अहवाल स्वीकारुन सहकार्य करावे.

सोबत :–
१) अहवाल
२) फोटो व
३) पेपरचे कात्रन

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science College Ashti, Dist.Beed

PRINCIPAL
Arts,Commerce & Science College,Ashti,Tal.Ashti,Dist.Beed

राष्ट्रीय सेवा योजना ... 7/10/19

PRINCIPAL
Arts Commerce & Science College,Ashti Tal.Ashti Dist Beed

# स्वच्छता हि सेवा २०१९ अभियान अहवाल

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी येथे महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने स्वच्छता हे सेवा व सामुदाईक प्लास्टिक मुक्ती साठी श्रमदान हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.त्याचे सविस्तर माहिती पुढील प्रमाणे,

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास प्राप्त संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे पत्र कर. NSS/२०१९-२०/१२१४ दि.०१/१०//२०१९ नुसार अगोदरच्या दिवसी दि.०१/१०/२०१९ रोजी नोटिस कडून सकाळी सात वाजता महाविद्यालया येण्याचे सर्व विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांना आव्हान केले.

त्यानुसार सकाळी सात वाजता महाविद्यालयात आल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवी सातभाई यांनी स्वच्छता हे सेवा व सामुदाईक प्लास्टिक मुक्ती साठी श्रमदानहा कार्यक्रमाचे स्वरूप सांगितले, त्याचे मागची पाश्वर्भूमी सांगून आज महात्मा गांधी यांना त्यांच्या १५० व्या जयंती निमित्य आदरांजली देण्यासाठी आपण सर्वांनी स्वच्छता हे सेवा व सामुदाईक प्लास्टिक मुक्ती साठी श्रमदान करावे असे आहवन केले. त्यानंतर मा. प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला हार घालून या स्वच्छता हे सेवा व सामुदाईक प्लास्टिक मुक्ती साठी श्रमदानहा कार्यक्रम सुरु केला. स्वतः प्राचार्य साहेब विद्यार्थी सोबत यात सहभागी होऊन प्लास्टिक जमा करत होते.

या दरम्यान जमा झालेला प्लास्टिक कचरा महाविद्यालयात एकत्र करण्यात आला व त्याचे वर्गीकरण करून विल्हेवाट लावण्यात आली. त्यानंतर महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला.

महाविद्यालय सभागृहात महात्मा गांधी यांची अहिंसा: एक शक्ती या विषयावर प्रा. डॉ. अभय शिंदे यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर अल्प उपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

या वेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे २१३ स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवी सातभाई, प्रा. शुभांगी खुडे यांनी मेहनत घेतली व कार्यक्रम संपन्न केला.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed






**PRINCIPAL**
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

**Programme Officer(NSS)**
ATSPM, Arts, Commerce & Science
College Ashti, Dist.Beed

## हंबर्डे महाविद्यालय, आष्टी

आष्टी : येथील हंबर्डे महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने फिट इंडिया मोहिमेअंतर्गत दोन कि. मी. दौड करून महापुरुषांना अभिवादन केले. यावेळी प्रा. डॉ. अभय शिंदे यांचे महात्मा गांधीजी याची अहिंसा : एक शक्ती या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी महात्मा गांधींनी अहिंसा तत्त्व हे एक कसे शक्तिशाली अस्त्र होते, याचे सुंदर विवेचन केले. गांधींच्या तत्त्वाने आयुष्यभर जगणारे लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याचे विवेचन डॉ. सखाराम वांढरे यांनी केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी गांधी विचारांची आज खऱ्या अर्थाने गरज असून तो विचारच देशाला तारेल, असे प्रतिपादन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. अविनाश कंदले, प्रा. अशोक भोगाडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. रवी सातभाई, प्रा. महेंद्र वैरागे यांनी परिश्रम घेतले.

## हंबर्डे महाविद्यालय, आष्टी

आष्टी : येथील हंबर्डे महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने फिट इंडिया मोहिमेअंतर्गत दोन कि. मी. दौड करून महापुरुषांना अभिवादन केले. यावेळी प्रा. डॉ. अभय शिंदे यांचे महात्मा गांधीजी याची अहिंसा : एक शक्ती या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी महात्मा गांधींनी अहिंसा तत्त्व हे एक कसे शक्तिशाली अस्त्र होते, याचे सुंदर विवेचन केले. गांधींच्या तत्त्वाने आयुष्यभर जगणारे लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याचे विवेचन डॉ. सखाराम वांढरे यांनी केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी गांधी विचारांची आज खऱ्या अर्थाने गरज असून तो विचारच देशाला तारेल, असे प्रतिपादन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. अविनाश कंदले, प्रा. अशोक भोगाडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. रवी सातभाई, प्रा. महेंद्र वैरागे यांनी परिश्रम घेतले.

PRINCIPAL
Arts Commerce & Science
College,Ashti Tal.Ashti Dist Beed

Programme Officer(NSS)
ATSPM, Arts, Commerce & Scien.
College Ashti, Dist.Beed